# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २६/०८/२०१८

### सखीमंचातर्फे नाशिक ग्रामीण जिल्हयातील पोलीस ठाण्यांमध्ये राखी विथ खाकी उपक्रम

---

सदैव सर्वसामान्यांच्या रक्षणासाठी तैनात असलेल्या पोलीसांना कोणताही सण किंवा उत्सव कुटूंबियांसोबत साजरा करता येत नाही. ज्यावेळी सर्वसामान्य नागरीक सण साजरा करतात, त्यावेळी सर्वसामान्यांचा हाच उत्साह अबाधित रहावा, म्हणुन पोलीस त्यावेळी आपले कर्तव्य बजावत असतात. पोलीसांची हिच कर्तव्य भावना ओळखुन त्यांच्याप्रति आदर व्यक्त करण्यासाठी पोलीस सखी मंचातर्फे नाशिक ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये आज रोजी नारळी पौर्णिमा / रक्षाबंधनाचे दिवशी राखी विथ खाकी हा उपक्रम राबविण्यात आला.

या उमक्रमाअंतर्गत पोलीस सखी मंचातील महिला व युवती, शालेय विद्यार्थीनी तसेच पोलीस कुटूंबातील महिलांनी जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांमधील अधिकारी व कर्मचारी यांना राख्या बांधल्या. सण उत्सवांचे काळात ब-याच पोलीसांना कर्तव्य बजावत असतांना घराबाहेर रहावे लागते, त्यासाठी आज रोजी रक्षाबंधनाचे दिवशी जिल्हयातील ४० पोलीस ठाण्यांअंतर्गत पोलीस सखी मंचातर्फे राखी विथ खाकी हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपस्थित महिला व युवती, शालेय विद्यार्थीनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले, तसेच हत्यारांच्या हाताळणीविषयी माहिती देण्यात आली. याप्रसंगी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सदर उपक्रमाबाबत माहिती देतांना सांगितले की, समाजातील स्त्रियांच्या सहभागाशिवाय पोलीसांना आपले काम करणे शक्य नाही, त्यामुळे स्त्रिया या देखील पोलीस मित्र तयार झाल्याशिवाय त्यांच्या समस्यांपर्यंत पोलीस पोहचु शकणार नाहीत. यासाठी महिलांनी सक्षम व निर्भयतेने पोलीस दलाची मदत घेवुन अत्याचाराच्या घटनांचा समुळ नायनाट करणेसाठी अन्यायाला विरोध करा असे आवाहन करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांचे संकल्पनेतुन रक्षाबंधानाचे दिवशी राबविण्यात आलेल्या सदर उपक्रमाबाबत पोलीसांमध्ये उत्सहाचे वातावरण होते. यावेळी विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिका-यांनी कर्मचा-यांचा ताण-तणाव दुर होण्यास असे उपक्रम उपयोगी ठरतात असे प्रतिपादन करून ग्रामीण पोलीस दलात रक्षाबंधन सण उत्सहात साजरा करण्यात आला.